प्रेस नोट दिनांक :— १२/१०/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.गजानन प्रल्हादराव खुरक्टे, वय ५६ वर्ष, सहा.पो.उप. नि. बं.न. ७६२, पो.स्टे.भातकुली, अमरावती शहर. २) मोहम्मद ईस्माईल शेख उमर, वय ५२ वर्ष, पोलीस हवालदार, ब.नं. १०१८, पो.स्टे. भातकुली, अमरावती शहर ( दोन्ही वर्ग ३) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | २९.०९.२०२२ चे १७/२१ वा. ते १७/५६ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ५,०००/— रु. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | तक्रारदार यांचेवर संशय आल्याने तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारली नाही. |
| ६ | घटनास्थळ | पोलीस स्टेशन भातकुली, अमरावती शहर. |

यातील तक्रारदार यांनी दिनांक २९/०९/२०२२ रोजी कार्यालयात येवुन त्यांचे नातेवाईक (साळा) यांचे विरूध्द पो.स्टे.भातकुली, अमरावती शहर येथे दाखल शेतातील पाण्याचे मोटर चोरीचे गुन्हयामध्ये अटक न करण्याकरीता तसेच लवकर जमानत मिळण्याकरीता मदत करण्याकरीता पोलीस स्टेशन भातकुली अमरावती येथील पोलीस श्री.गजानन खुरक्टे व पोलीस मोहम्मद ईस्माईल हे लाचेची मागणी करीत असल्याची लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. २९/०९/२०२२ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना पोलीस स्टेशन भातकुली येथील पोलीस श्री.गजानन खुरक्टे व पोलीस मोहम्मद इस्माईल यांनी त्यांचे साळा विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करण्याकरीता तसेच लवकरात लवकर जमानत मिळण्याकरीता ५,०००/— रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक ०३/१०/२०२२ रोजी पंचासमक्ष आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री. गजानन खुरक्टे व आलोसे मोहम्मद ईस्माईल यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. वरून आज दिनांक १२/१०/२०२२ रोजी दोन्ही आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.संजय महाजन, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, श्री.एस.एस.भगत, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.संतोष इंगळे, पो.नि.सतिष उमरे, पो.ना.विनोद कुंजाम, पो.ना.निलेश महिंगे, पो.ना.युवराज राठोड,पो.कॉ.आशिष जांभोळे, पो.कॉ.रोशन खंडारे व चालक पो.उप.नि.सतीश किटकूले, श्री.प्रदीप बारबुध्दे यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्कः अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर — १०६४

(संतोष इंगळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
अमरावती

PPO F9 Pro · ©clicked by santosh